नि. फौ. ख. क्र. १३१/२०१९ निशाणी २८

**सरकार तर्फे साक्षीदार क्र.५ यांचा शपथेवर जबाब**
**मी सत्यप्रतिज्ञेवर कथन करते/करतो की,**

नाव – दुर्गा सखाराम सातरोठे

वय – ६१ वर्षे, व्यवसाय – सेवानिवृत्त, सहकार अधिकारी, मालेगाव

पत्ता – रा. महाकाली नगर, जुने शहर, शाळा क्र.१९ च्या पाठीमागे, अकोला, ता. जि. अकोला.

**सरकारतर्फे सरकारी वकिल श्रीमती फौजिया त. अ. सादिक यांचेमार्फत सरतपास सुरुः**

१. सन २०१८ मी अकोला येथे उप निबंधक सहकारी संस्था येथे कार्यरत होते. परंतु मी प्रतिनियुक्तीवर पातूर येथे सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था येथे कार्यरत होती. माझ्या कामाचे स्वरुप सावकारी परवाने देणे, सावकारी नियमाअंतर्गत आलेल्या तक्रारीवर कारवाई करणे, तसेच वरीष्ठांच्याकडे प्राप्त झालेल्या तक्रारी त्यांच्या आदेशाप्रमाणे कारवाई करणे इ. होते. सन २०१८ मध्ये मी पातूर येथे कार्यरत असताना माझे वरीष्ठ जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था यांच्याकडून सचिन त्र्यंबक वानखडे रा. व्याळा हे अवैध सावकारी करतात अशी तक्रार त्यांच्याकडे प्राप्त झाली होती, त्या माहितीच्या आधारे माझी पथक प्रमुख म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. माझ्यासोबत इतर ७ लोक व २ पोलीस कर्मचारी असे एकुण ९ लोक होते. सदर पथकामध्ये पंच म्हणून तलाठी सागर देविदास बोनगिरे होते.

२. दि. २८.१२.२०१८ रोजी मी व माझ्यासोबत असलेले पथकातील सर्व कर्मचारी सचिन त्र्यंबक वानखडे रा. व्याळा येथे त्याच्या घरी गेलो. आम्ही सचिन त्र्यंबक वानखडे यास आमची अंगझडती घेण्यास सांगितले, त्याच्या सोबत त्याची पत्नी होती. त्याने आमची अंगझडती घेण्यास नकार दिला. आम्ही स्वतःची अंगझडती स्वतःच दिली. मी माझ्या सहीचे सचिन वानखडे यास पत्र दिले व त्या पत्राद्वारे सांगितले की, तुमच्या घरामध्ये सावकारी परवाना आहे काय, अशी विचारणा केली. त्याने त्यास नकार दिला. आम्ही सचिन वानखडे याच्या घराची झडती घेतली. सदर घराच्या किचन रुमच्या बाजूला एक लोखंडी कपाट होते, ते कपाट त्यांना उघडण्यास सांगितले. सदर कपाटामध्ये काही कागदपत्रे सापडली. त्या कागदपत्रांमध्ये एक रु.१००/– चा कोर्ट फी स्टॅम्प सापडला त्यावर दि.

३०.१२.२०१७ ही तारीख नमुद केली होती. त्या स्टॅम्प पेपरमध्ये नमुद केलेले होते की, मी सहदेव यादव हिरोळे रा. आंबेडकर नगर, अकोला ह.मु. व्याळा मी सचिन त्र्यंबक वानखडे याच्याकडून रु.१५,०००/– ५ टक्के दराने उसने घेत आहे, त्याची परतफेड ६ महिन्यांमध्ये करणार, त्या बदल्यात त्यांची होंडा गाडी गहाण ठेवत आहे. सदर स्टॅम्प पेपर आम्ही जप्त केला. त्याचा पंचनामा तयार केला. सदर पंचनाम्याची एक प्रत सचिन वानखडे यास दिली. आता मला नि.क्र.२३ कडील जप्ती पंचनामा दाखविण्यात आला त्यावर माझी, सचिन वानखडे, दोन पंचांची व इतर पथकामधील सदस्यांची सही आहे. आता मला नि.क्र.२४ कडील जप्त केलेला स्टॅम्प पेपर दाखविण्यात आला. तो तोच आहे.

३. मी सदर जप्त केलेल्या स्टॅम्प पेपर व जप्ती पंचनामा हा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अकोला यांच्याकडे पुढील कारवाईकरीता पाठविले. पोलीसांनी माझी सदर घटनेबाबत विचारपुस केली नाही. मी सचिन वानखडे यास ओळखू शकते. आरोपीस साक्षीदार यांनी न्यायालयात हजर असल्याबाबत ओळखले.

सरतपास पूर्ण.

**<u>आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. एस. टी. इंगळे यांचे मार्फत उलटतपासः</u>**

४. हे म्हणणे खरे आहे की, मी ज्या घराची झडती घेतली त्या घराच्या मालकीबाबत कोणतेही कागदपत्र प्राप्त केले नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, ज्या घराची मी झडती घेतली ती झडती घेण्यापुर्वी गावातील कोणत्याही प्रतिष्ठीत व्यक्तीला बोलावून ते घर कोणाचे आहे, याबाबत विचारणा केली नाही. हे म्हणणे खरे आहे की, सदर घराच्या आजूबाजूस कोणाच्या मालकीची घरे आहेत व कोणाची मालमत्ता आहे, याबाबत मी ग्रामपंचायतीमध्ये चौकशी केली नाही. मला कोर्ट फी स्टॅम्प व नॉन ज्युडीशिअल स्टॅम्प यामधील फरक समजतो.

५. मी जे पत्र सचिन वानखडे यांना घर झडती पुर्वी दिले होते, ते पत्र चौकशीकामी पोलीसांना दिले नाही. हे म्हणणे खरे आहे की, पोलीस माझ्याकडे आले नाहीत व माझ्याकडे कोणतीही चौकशी केली नाही. दि.३०.१२.२०१७ चा आम्ही केलेला जप्त केलेला स्टॅम्प हा आम्ही लाखेचे सिल करुन तो जिल्हा कोषागार यांच्याकडे पाठविला होता, असे घडले होते. आम्ही ज्या वेळेची लाखेचे सिल केले त्या लिफाफ्याचा पंचनामा केला होता. सदर लिफाफा कोणाच्या ताब्यात आहे, हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे

खरे आहे की, दि. २८.१२.२०१८ रोजी नंतर मी कोणत्याही प्रकारे चौकशी केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, दि.२८.१२.२०१८ रोजीचा तथाकथित जप्ती पंचनामा आम्ही आमच्या कार्यालयात बसून तयार केला. आम्हाला घरझडती जो स्टॅम्प पेपर मिळून आला तो स्टॅम्प पेपर कोणी विकत आणला होता, याबाबत त्यावर काही मजकूर नमुद होता अथवा नाही, याबाबत मला आता आठवत नाही. हे म्हणणे खरे आहे की, सदर स्टॅम्प पेपर कोणी आणला हा सदर स्टॅम्प पेपरवर नमुद केलेला मजकूर मी न पाहता सिलबंद केला.

६. आता मला नि.क्र.२४ कडील स्टॅम्प पेपर दाखविण्यात आला. सदर स्टॅम्प पेपर हा कोर्ट फी नसून तो भारतीय गैर न्यायिक आहे. हे म्हणणे खरे नाही की, दि. २८.१२.२०१८ रोजी घर झडती व जप्ती करण्याबाबत मला कोणताही आदेश प्राप्त झालेला नव्हता. मी आज पुरावा देण्यापुर्वी सदर प्रकरणाचा अभिलेख पाहिला नाही. मला माझ्या वरीष्ठांनी दिलेल्या लेखी आदेशाची निश्चित तारीख माहित नाही, परंतु तो दि. २८.१२.२०१८ रोजीच्या दोन तीन दिवसांपुर्वीचा होता. हे म्हणणे खरे नाही की, सदर लेखी आदेशाची प्रत मी आरोपीला दाखविली नाही. मला घर झडतीचे लेखी आदेश आहेत, याबाबतचा आदेश मी पोलीसांना दिला होता. मी पुन्हा सांगतो की, सदर लेखी आदेश मी स्वतः पोलीसांना दिला नव्हता.

७. हे म्हणणे खरे नाही की, दि. २८.१२.२०१८ रोजी मी आरोपीच्या घराची झडती घेतली त्यामध्ये मला दि.३०.१२.२०१७ रोजीचा स्टॅम्प पेपर मिळून आला, हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, दि.२८.१२.२०१८ रोजी मी व्याळा गावामध्ये गेले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासामध्ये सांगितल्याप्रमाणे कोणतीही घटना घडलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आज न्यायालयात खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.
फेरतपास नाही.

**दिनांकः– २३.०७.२०२६**

**श्रवणोत्तर निवेदन स्विकृत**

DAYANAND MARUTI WAGHMARE

Digitally signed by DAYANAND MARUTI WAGHMARE
Date: 2026.07.23 16:58:06 +0530

**(डी. एम. वाघमारे)**
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,**
**(न्यायालय क्र.२), बाळापूर.**

<u>प्रमाणपत्र</u>

मी अधिकथन करतो की, पी.डी.एफ. करुन अपलोड केलेल्या न्यायनिर्णय/आदेश/ पुरावा मधील शब्द नि शब्द हे मुळ न्यायनिर्णय/पुरावा/आदेशाप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| न्यायालयाचे नाव | :– | **श्री. डी. एम. वाघमारे,**<br>सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, व प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, बाळापूर. |
| लघुलेखकाचे नाव | :– | अजय एन. हांडे |
| घोषित दिनांक | :– | २३/०७/२०२६ |
| न्यायनिर्णय/ आदेश/ पुराव्यावर पिठासीन अधिकारी यांनी केलेल्या स्वाक्षरीचा दिनांक | :– | २३/०७/२०२६ |
| अपलोड केल्याचा दिनांक | :– | २३/०७/२०२६ |